RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष १२, अंक ५]    गुरुवार ते बुधवार, जानेवारी २९-फेब्रुवारी ४, २०२६/माघ ९-१५,   शके १९४७  [पृष्ठे, १० किंमत : रुपये १५.००

### प्राधिकृत प्रकाशन

### संकीर्ण सूचना व जाहिराती

### बृहन्मुंबई महानगरपालिका

क्रमांक प्र.अ./(वि.नि)/२३३६७/प.उप/एच व के
दिनांक २१ जानेवारी २०२६

**सूचना**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख करणेत आलेला आहे) चे कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाने अधिसूचना क्र.टीपीबी ४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दि. ८/०५/२०१८ (परिशिष्ट–अ) (यापुढे "उक्त अधिसूचना" असा उल्लेख करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ (यापुढे "उक्त विकास योजना" असा उल्लेख करणेत आलेला आहे) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला मंजूरी दिली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य शासनाने बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ च्या (परिशिष्ट – अ) (अधिसूचनेच्या परिशिष्ट – ब मधील वगळलेले भाग सोडून) मंजूरी दिली आहे आणि दिनांक ०१.०९.२०१८ पासून सदर विकास आराखडा लागू करण्यात आला आहे. कालांतराने तद्नंतर, 'परिशिष्ट–ब' मधील वगळलेले भाग विविध अधिसूचनांद्वारे महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेले आहेत.

ज्याअर्थी, 'के/पश्चिम' विभागाच्या मंजूर विकास नियोजन आराखडा – २०३४ नुसार मौजे ओशिवरा  येथील न. भू. क्र. २८० (भाग), ३४१(भाग), ३४०/१(भाग), ३३८(भाग), ३३८/१(भाग), ३३७(भाग), ३३६(भाग), ५५७ (भाग) व ५५७/१(भाग) या भूखंडामधून जाणारा ९.१४ मी रुंदीचा रस्ता दर्शविण्यात आला असून सद्यःस्थितीमध्ये सदर संरेखनाच्या रेषेमध्ये अस्तित्वातील बांधकामे / इमारती असल्याने प्रस्तावित रस्ता विकसित करणे शक्य नाही. त्यामुळे न.भू.क्र. २८० वरील प्रस्तावित झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामधील निर्माणाधीन इमारतीकरिता सद्यःस्थितीत ९.१४मी. रुंदीचा रस्ता उपलब्ध होऊ शकत नाही.

ज्याअर्थी, प्रस्तुत रस्त्याचे रुंदीकरण हे विकास नियोजन आराखड्याच्या 'परिशिष्ट –ब' मध्ये नमूद सारभूत स्वरूपाचे फेरबदल या अंतर्गत EP-KW123 या क्रमांकांन्वये दर्शविण्यात आले होते. सदर फेरबदल महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचना क्र. टीपीबी-४३२०/टीपीबी-४३२०/प्र.क्र. १३५/ २०२०/नवि-११ दिनांक १२.०९.२०२२ अन्वये मंजुर करण्यात आले. तथापि, सदर मंजुरी प्रमाणे ९.१४मी. रुंदीचा रस्ता हा सद्यःस्थितीत मोकळा नसून शासनाने मंजूर केलेल्या संरेखनानुसार सदर रस्ता तातडीने विकसित करणेही शक्य होणार नाही.

त्याअर्थी, वरील वस्तुस्थिती लक्षात घेता, मौजे ओशिवरा, न.भू.क्र. २८० या भूखंडावरील प्रस्तावित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे विकासक मे. मेगा इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ११९५/२०२२ दाखल करून सद्यःस्थितीत उपलब्ध ९.१४ मी. रुंद जागेवर प्रस्तावित रस्त्याचे पुनर्संरेखन करण्याकरिता महापालिका व शासनास निर्देश देण्यात यावेत अशी विनंती माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांना केली आहे. सदर याचिकेच्या दिनांक ०२.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये माननीय उच्च न्यायालय, मंबई यांनी याचिकाकर्त्यांना प्रस्तावित पुनर्संरेखनाचे नकाशे सादर करण्याचे आणि महानगरपालिकेस याचिकाकर्त्याच्या प्रस्तावित रस्त्याच्या पुनर्संरेखनाच्या प्रस्तावावर निर्णय घेऊन त्यांच्या विनंतीनुसार सदर प्रस्तावावर उचित कार्यवाही करण्याचे व शासनास प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

ज्याअर्थी, सदर माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, प्रस्तावित पुनर्संरेखनाकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम , १९६६ च्या कलम ३७ मधील तरतूदींनुसार मंजूर विकास आराखडा – २०३४ मध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, मौजे ओशिवरा मधील न.भू.क्र. ५५७/१ या भूखंडावरील प्रस्तावित इमारतीकरिता मंजूर केलेल्या नकाशांनुसार सदर इमारतीच्या पश्चिमेकडील पार्कींग टॉवरच्या फाऊंडेशन पासून ते रस्त्याच्या पलिकडच्या न.भू.क्र. ३३६ वरील अस्तित्वातील समता विकास सह-गृह. संस्थेच्या इमारतीपर्यंतची रुंदी ७.५७मी. म्हणजेच ९.१४मी पेक्षा कमी असून सद्यस्थितीत ही रुंदी ९.१४ मी. मिळणे शक्य नाही. तथापि, भविष्यात न.भू.क्र. ३३६ वरील अस्तित्वातील इमारतीचा पुनर्विकास प्रस्ताविल्यानंतर ९.१४ मी. रुंदी उपलब्ध होऊ शकेल. यास्तव, याचिकाकर्त्याने सुचविलेल्या प्रस्तावित पुनर्संरेखनात काही प्रमाणात बदल करून मौजे ओशिवरा येथील न.भू.क्र. २८० पासून ते बेहराम बाग रस्त्यापर्यंत ९.१४ मी. रुंद रस्त्याकरिता माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार, प्रस्तावित रस्त्याचे पुनर्संरेखन, फेरबदल नकाशामध्ये A ते B ने दर्शविल्याप्रमाणे प्रस्ताविण्यात येत आहे. तसेच, प्रस्तावित फेरबदलामुळे रस्त्याच्या आधीच्या संरेखनामधून वगळण्यात येणा-या मौजे ओशिवरा मधील न.भू.क्र. ५५७(भाग) या अंदाजे ११३.०७ चौ.मी. भूखंडावर लगतच्या ROS1.4 (खेळाचे मैदान) आणि आधी बाधित होणा-या इतर उर्वरीत भूखंडांवर नजिकच्या निवासी क्षेत्राचे आरक्षण दर्शविण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे.

ज्याअर्थी, महानगरपालिकेचे परिपत्रक क्र. बीएमसी/ एडीएमएन/ ३ दि. ०७.०४.२०२२ नुसार अद्यावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६क(१) अन्वये महानगरपालिका आणि महानगरपालिकेच्या इतर प्राधिकरणांचे सर्व अधिकार आता प्रशासकांकडे निहित आहेत. त्यानुसार, सदर प्रस्तावास प्रशासक (सुधार समिती) यांनी ठराव क्र. ७३ दि. २५ नोव्हेंबर २०२५ अन्वये मंजूरी दिल्यानंतर सदर प्रस्तावास महानगरपालिकेला मंजूरी करीता शिफारस करण्यात आली होती व सदर प्रस्ताव प्रशासक (महानगरपालिका) यांनी ठराव क्र. ८४७ दि. १ डिसेंबर २०२५ अन्वये मंजूर केला, जेणेकरून के/पश्चिम विभागाच्या मंजूर विकास आराखडा, २०३४ मधील मौजे ओशिवरा येथील न.भू.क्र. २८० (भाग), ३४१(भाग), ३४०/१(भाग), ३३८(भाग), ३३८/१(भाग), ३३७(भाग), ३३६(भाग), ५५७ (भाग) व ५५७/१(भाग) या भूखंडामधून जाणाऱ्या प्रस्तावित ९.१४मी. रुंद विकास नियोजन रस्त्याचे पुनर्संरेखन (Re-alignment) करणे आणि ह्यापूर्वीच्या संरेखनामधून वगळण्यात येणा-या न.भू.क्र. ५५७(भाग) या अंदाजे ११३.०७ चौ.मी. भूखंडालगतच्या निळ्या रंगाच्या रेषेने सिमांकित करून P-Q-R-S-P या इंग्रजी आद्याक्षरांनी दर्शविल्यानुसार लगतच्या ROS1.4 (खेळाचे मैदान) ह्या आरक्षणात समाविष्ट करणे तसेच पुनर्संरेखनापूर्वी बाधित होणा-या इतर उर्वरीत भूखंडांवर नजिकच्या निवासी क्षेत्राचे आरक्षण दर्शविणे करिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ३७(१) मधील तरतुदीनुसार फेरबदल करण्याच्या प्रस्तावाची कार्यवाही सुरु करणे, विहीत कालावधीमध्ये सूचना / हरकती मागविणे व प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी देणे आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(२) नुसार फेरबदल प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची अंतिम मंजूरी घेणेकरिता नगरविकास विभाग खात्याशी संपर्क साधण्याची मंजूरी दिली आहे.

त्याअर्थी, फेरबदल नकाशा क्र. प्र. अ. /वि.नि. / प.उप./००१२६/एच व के दि.११.११.२०२५ मध्ये इंग्रजी आद्याक्षरे A ते B ने लाल रंगाच्या तुटक रेषेने सीमांकित करून दर्शविल्यानुसार, के/पश्चिम विभागाच्या मंजूर विकास आराखडा, २०३४ मधील मौजे ओशिवरा येथील न.भू.क्र. २८० (भाग), ३४१(भाग), ३४०/१(भाग), ३३८(भाग), ३३८/१(भाग), ३३७(भाग), ३३६(भाग), ५५७ (भाग) व ५५७/१(भाग) या भूखंडामधून जाणाऱ्या प्रस्तावित ९.१४मी. रुंद विकास नियोजन रस्त्याचे पुनर्संरेखन (Re-alignment) करण्याकरिता खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार फेरबदल करणे प्रस्तावित आहे.

| मंजूर विकास आरखडा -२०३४ नुसारची तरतूद | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कलम३७(१) मधील तरतुदीनुसार प्रस्तावित फेरबदल |
|---|---|
| मौजे ओशिवरा येथील न. भू. क्र. २८० (भाग), ३४१(भाग), ३४०/१(भाग), ३३८(भाग), ३३८/१ (भाग), ३३७(भाग), ३३६(भाग), ५५७ (भाग) व ५५७/१(भाग) या भूखंडामधून जाणारा ९.१४ मी रुंदीचा रस्ता दर्शविण्यात आला आहे. | मौजे ओशिवरा येथील न.भू.क्र. २८० (भाग), ३४१(भाग), ३४०/१(भाग), ३३८(भाग), ३३८/१(भाग), ३३७(भाग), ३३६(भाग), ५५७ (भाग) व ५५७/१(भाग) या भूखंडामधून जाणाऱ्या प्रस्तावित ९.१४मी. रुंद विकास नियोजन रस्त्याचे इंग्रजी आद्याक्षरे A ते B ने लाल रंगाच्या तुटक रेषेने सीमांकित करून नकाशावर दर्शविल्यानुसार पुनर्संरेखन (Re-alignment) करणे व संरेखनामधून वगळण्यात येणा-या न.भू.क्र. ५५७(भाग) या अंदाजे ११३.०७ चौ.मी. भूखंडालगतच्या निळ्या रंगाच्या रेषेने सिमांकित करून P-Q-R-S-P या इंग्रजी आद्याक्षरांनी दर्शविल्यानुसार लगतच्या ROS1.4 (खेळाचे मैदान) ह्या आरक्षणात समाविष्ट करणे व पुनर्संरेखनापूर्वी बाधित होणा-या इतर उर्वरीत भूखंडांवर नजिकच्या निवासी क्षेत्रात समाविष्ट करणे. |

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व अधिकारांचा वापर करुन, बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून हरकती/सूचना मागविण्यासाठी तसेच संभाव्य बाधित होणा-या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर सूचना प्रसिद्ध करीत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून असेही कळविण्यात येत आहे की, वरील प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती/सूचना, सदर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लेखी स्वरुपात प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे महानगरपालिका मुख्यालय, ५ वा मजला, विस्तारित इमारत, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. सदरच्या कालावधीत प्राप्त होणा-या हरकती/ सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना / हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी खालील कार्यालयांत उपलब्ध करण्यात आला आहे. :

(१) प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

(२) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, इन्साहटमेंट, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

दिनांक २१ जानेवारी २०२६,
PRO/2736/ADV/2025-26.

**सुनिल हि. राठोड,**
प्रमुख अभियंता (विकास नियोजन).

## BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION

क्रमांक प्र.अ./(वि.नि)/२३३६७/प.उप/एच व के
दिनांक २१ जानेवारी २०२६

### Notice

Whereas, as per the powers conferred by sub-section (*1*) of Section31 of the MR & TP Act, 1966, State Government has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Development Plan") *vide* Notification No. TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08.05.2018 (Schedule A) (hereinafter referred to as "the said Notification") alongwith the Development Control and Promotion Regulations-2034 for Greater Mumbai. And whereas, the Govt. of Maharashtra has accorded sanction to the Development Plan-2034 (Schedule 'A') (excluding the EP portion mentioned in 'Schedule B' of the Notification) and the same have already come into force from 01.09.2018. The EP portion mentioned in 'Schedule B' of the Notification are subsequently sanctioned by the GoM *vide* various notifications in due course.

And whereas, as per sanctioned DP-2034 of 'K/W' Ward, CTS No. 280(pt), 341(pt), 340/1(pt), 338(pt), 338/1(pt), 337(pt), 336(pt), 557(pt) and 557/1(pt) of village Oshiwara are affected by 9.14m wide DP road. Since there are existing structures/ buildings in the said alignment, it is not possible to develop the DP road. Therefore, 9.14m wide DP road cannot be made available at present for the ongoing redevelopment proposal under Slum Rehabilitation Scheme on CTS no. 280 of village Oshiwara.

And whereas, as per sanctioned DP-2034 of 'K/W' Ward, the road under reference was under EP-KW123. The Substantial Modification as proposed u/s 31 of MR&TP Act, 1966 in the said EP-KW123 is sanctioned by the Govt. of Maharashtra *vide* notification no. TPB-4320/CR-l35/2020/UD-11 dtd. 12.09.2022. However, the said 9.14m. wide DP road is not vacant and it is not feasible to develop the said road to its full width immediately as per the alignment approved by Govt. of Maharashtra.

And whereas, the developer of proposed Slum Rehabilitation Scheme on CTS No. 280 of village Oshiwara, M/s. Mega Infrastructure Developers have filed Writ Petition No. 1195 of 2022 before Hon. High Court, Bombay regarding providing 9.15m wide access to the plot bearing CTS No. 280 of village Oshiwara at Jogeshwari (W) situated in K/W ward by realigning the existing road. Hon'ble High Court, Bombay *vide* order dtd. 02.07.2025 directed the petitioner to submit the plan for realignment of access to their plot of land (CTS no. 280 of village Oshiwara) within a period of two weeks. It is further directed by Hon'ble High Court to BMC to consider the request of the petitioner and if need be submitted for modification of realignment of DP road by proper procedure in that regard to be adopted by submitting the proposal to the State Government.

And whereas, as per order dated 02.07.2025, it is necessary to modify sanctioned DP-2034 as per the provision of sec 37 of MRTP Act, 1966 for the proposed re-alignment.

And whereas, as per the approved plans for the proposed building on CTS No. 557/1 of village Oshiwara, the width from the foundation of the parking tower on the west side of the said building to the existing Samata Vikas CHS on plot bearing CTS no. 336 of village Oshiwara on the other side of the road is approx. 7.57m. which is less than 9.14m. and at present it is not possible to get width of 9.14m at this location. However, in future, while redevelopment of the existing building on CTS No. 336, width of 9.14m. can be available. Therefore, by making some changes in the proposed realignment submitted by the petitioner, the realignment and modification of the proposed road from CTS No. 280 of Oshiwara to Behram Bagh Road to a width of 9.14m is being proposed as per the order of the Hon'ble High Court, Bombay as shown by A to B on the modification plan. Also, due to the proposed realignment, the area of approx. 113.07 Sq.M. of road portion from CTS No. 557(pt) of village Oshiwara so released is proposed to be included in adjoining ROS1.4 (Playground) reservation and area released from other CTS Nos. is proposed to be included in 'R'zone.

And whereas, the proposal for above modification is approved by Administrator (Improvement Committee) *vide* No. 73 dated 25th November 2025 and further approved by Administrator

(Corporation) *vide* resolution no. 847 dated 1st December 2025, to take further action to modify DP-2034 of K/W ward by realigning the 9.14m wide D.P. Road affecting CTS No. 280(pt), 341(pt), 340/1(pt), 338(pt), 338/1(pt), 337(pt), 336(pt), 557(pt) and 557/1(pt) of village Oshiwara in sanctioned DP-2034 of K/W ward and to include the land so released form CTS No. 557(pt) of village Oshiwara in adjoining ROS1.4 (Playground) reservation and to include area released from other CTS Nos. in 'R' zone & to invite suggestions/ objections from general public u/s. 37(1) of MRTP Act, 1966 and to approach State Govt. in Urban Development Dept. for final sanction u/s. 37(2) of MRTP Act, 1966 for the proposed modification in Sanctioned DP 2034.

And therefore, it is proposed to realign the 9.14m. wide D.P. Road affecting CTS No. 280(pt), 341(pt), 340/1(pt), 338(pt), 338/1(pt), 337(pt), 336(pt), 557(pt) and 557/1(pt) of village Oshiwara more specifically as described in the table mentioned below:—

| As per sanctioned DP-2034 | Proposed Modification under section 37(1). |
|---|---|
| The 9.14m wide D.P. Road affecting CTS No. 280(pt), 341(pt), 340/1(pt), 338(pt), 338/1(pt), 337(pt), 336(pt), 557(pt) and 557/1(pt) of village Oshiwara. | The 9.14m wide D.P. Road affecting CTS No. 280(pt), 341(pt), 340/1(pt), 338(pt), 338/1(pt), 337(pt), 336(pt), 557(pt) and 557/1(pt) of village Oshiwara is realigned as shown by bounded red dotted lines and marked with A-B on plan and the land so released form CTS No. 557(pt) of village Oshiwara adm. 113.07 sq.m. shown as P-Q-R-S-P on the plan is included in adjoining ROS1.4 (Playground) reservation and area released from other CTS Nos. is included in 'R'zone as shown on proposed modification plan. |

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers conferred by subsection (1) of Section 37 of the MR & TP Act, 1966; and of all other powers enabling it in this behalf, Brihanmumbai Municipal Corporation (hereinafter referred as BMC) hereby publishes a Notice for inviting objections/ suggestions from any persons with respect to proposed modification, as required by Section 37(*1*) of the said Act, for information of all persons likely to be affected thereby. BMC is further pleased to inform that any objections/ suggestions in respect of the proposed modification mentioned above may be forwarded, in writing before the expiry of one month from the date of publication of this notification, to the office of Chief Engineer (Development Plan), Brihanmumbai Municipal Corporation, 5th floor, Municipal Head office, Mahapalika Marg, Fort, Mumbai 400 001.

Any objections or suggestions, which may be received within the said period will be dealt with in accordance with the provisions of Section 37(*1*) of the said Act by the Chief Engineer (Development Plan) BMC. The Suggestions/Objections received after expiry period of one month will not be considered.

A part plan showing the proposed m odification is kept open for the inspection of the general public at the following offices:-

(1) Office of the Chief Engineer (Development Plan), 5th Floor, Brihanmumbai Municipal Corporation, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

(2) Office of the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

Dated 21st January 2026,
PRO/2736/ADV/2025-26.

S. H. RATHOD,
Chief Engineer,
(Development Plan).

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

### अधिसूचना

क्रमांक झोपुप्रा,बृ/अभि/ओडी/३क(१)/अधिसूचना/दुर्गा नगर एस.आर.ए. सह. गृह. संस्था (नियो.)/मरोळ/के-पू/२०२६/२५४०.—ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ब च्या पोट-कलम (३) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करून दिनांक ९ एप्रिल १९९८ रोजी **राजपत्रात** प्रसिद्ध केली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (क) उप-कलम (१) अनुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत.

त्याअर्थी, उक्त कलम ३ (क) चे उप-कलम (१) मधील अधिकाराचा वापर करून मी, खालीलप्रमाणे अनुसूचीमध्ये दर्शविलेले क्षेत्र "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून याद्वारे घोषित करीत आहे. सदरचे क्षेत्र बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ चे नियमन ३३ (१०) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करण्यास पात्र आहे.

### अनुसूची

### मौजे मरोळ, तालुका अंधेरी

**स्थळ** - दुर्गा पाडा, मरोळ मरोशी रोड, सेवन हिल्स हॉस्पिटलच्या समोर, अंधेरी (पू.), मुंबई. **प्रभाग** - के/पू

**अर्जदार - दुर्गा नगर एस. आर. ए. सह. गृह, संस्था (नियोजित)**

| अ. क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र (चौ. मी.) | एकत्रित चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | १०९/८अ/१ | ६१८५.५० | ६९.९३ | न.भू.क्र. १६० | न. भू. क्र. १०९/८अ/१ (पै) | न. भू. क्र. १०९/९ | न. भू. क्र. १०९/८अ/१ (पै) |
| २ | १०९/९ | १२८०.५० | १२८०.५० | न.भू.क्र. १६१ | रस्ता १०९/९/अ | न.भू.क्र १०९/१० | न.भू.क्र १०९/८अ/१(पै) |
| ३ | १०९/९/अ | ९६८.८० | ९६८.८० | न.भू.क्र. १०९/९ | रस्ता | न.भू.क्र १०९/१० | न.भू.क्र १०९/९, |
| ४ | १०९/१० | ३६४.०० | ३६४.०० | न.भू.क्र. २१३(पै) | रस्ता | न.भू.क्र. २०९ | न.भू.क्र १०९/९, १०९/९/अ |
| ५ | १६० | १०७६.२० | १०७६.२० | न.भू.क्र. २१४(पै) | न.भू.क्र. १०९/८अ/१(पै) | न.भू.क्र. १६१ | न.भू.क्र. १५९ |
| ६ | १६१ | १८३८.९० | १८३८.९० | न.भू.क्र. २१४(पै) | न.भू.क्र. १०९/९ | न.भू.क्र. २१३(पै) | न.भू.क्र. १६० व १०९/८अ/१(पै) |
| ७ | २१३ | १४८९.९० | ९.०९ | न.भू.क्र. २१३(पै) | न.भू.क्र. २१३(पै) | न.भू.क्र. २१३(पै) | न.भू.क्र. १६१ |
| ८ | २१४ | ७०३५.७० | ३३४.७८ | न.भू.क्र. २१४(पै) | न.भू.क्र. १६०, १६१ | न.भू.क्र. २१४ (पै) | न.भू.क्र. १५८ |

| अ. क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र (चौ. मी.) | एकत्रित चतुःसीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| ९ | (नियोजीत रस्त्यामध्ये झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र) | - | १२९.२८ | न.भू.क्र. १०९/९, १०९/९/अ, १०९/१० | रस्ता | रस्ता | रस्ता |
| | **एकूण** | **२०२३९.५** | **६०७१.४८** | | | | |

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई**
प्रशासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१,
दिनांक १९ जानेवारी २०२६.

**डॉ. महेंद्र कल्याणकर,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
बृहन्मुंबई.

## SLUM REHABILITATION AUTHORITY, BRIHANMUMBAI

*NOTIFICATION*

No. SRA,B/ED/OW/3C(1)/Notification/Durganagar SRA CHS/Marol/KE/2026/2540.—Whereas, the Slum Rehabilitation Authority has formed Slum Rehabilitation Scheme under the provision of Section 3B (*3*) of Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 and published in *Gazette* on 9th April 1998 ;

Whereas, in view of the provision of section 3C (*1*) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971, the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority, is empowered to declare any area as "Slum Rehabilitation Area".

Therefore, in view of the said provision of Section 3C (*1*) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971. I, undersigned hereby declare the area shown in schedule as "Slum Rehabilitation Area". Now the said area is open to submit scheme of slum rehabilitation as per regulation 33(*10*) of Development Control and Promotion Regulation, 2034 of Greater Mumbai.

*Schedule*

**Village Marol, Taluka Andheri**

**Place** – Durga Pada, Marol Maroshi Road, Opp. Seven Hills Hospital, Andheri (E.), Mumbai
**Ward** – K/E

**Applicant –Durga Nagar SRA CHS (prop).**

| Sr. No. | C.T.S. No. | Area as per Property card (Sq.mtr. | Area declared as "Slum Rehabilitation Area" (Sq. mtr.) | Consolidated Boundaries | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | East | West | South | North |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1 | 109/8A/1 | 6185.50 | 69.93 | C.T.S. No. 160 | C.T.S. No. 109/8A/ 1 (pt) | C.T.S. No. 109/9 | C.T.S. No. 109/8A/ 1(pt) |
| 2 | 109/9 | 1280.50 | 1280.50 | C.T.S. No. 161 | Road 109/9/A | C.T.S. No. 109/10 | C.T.S. No. 109/8A/1(pt) |
| 3 | 109/9/A | 968.80 | 968.80 | C.T.S. No. 109/9 | Road | C.T.S. No. 109/10 | C.T.S. No. 109/9 |
| 4 | 109/10 | 364.00 | 364.00 | C.T.S. No. 213 (pt) | Road | C.T.S. No. 209 | C.T.S. No. 109/9, 109/9/A |
| 5 | 160 | 1076.20 | 1076.20 | C.T.S. No. 214(pt) | C.T.S. No. 109/8A/ 1(pt) | C.T.S. No. 161 | C.T.S. No. 159 |
| 6 | 161 | 1838.90 | 1838.90 | C.T.S. No. 214(pt) | C.T.S. No. 109/9 | C.T.S. No. 213 (pt) | C.T.S. No. 160, 109/8A/ 1(pt) |
| 7 | 213 | 1489.90 | 9.09 | C.T.S. No. 213 (pt) | C.T.S. No. 213 (pt) | C.T.S. No. 213 (pt) | C.T.S. No. 161 |
| 8 | 214 | 7035.70 | 334.78 | C.T.S. No. 214 (pt) | C.T.S. No. 160, 161 | C.T.S. No. 214 (pt) | C.T.S. No. 158 |

| Village Marol, Taluka Andheri<br>Place – Durga Pada, Marol Maroshi Road, Opp. Seven Hills Hospital, Andheri (E.), Mumbai<br>Ward – K/E<br>Applicant –Durga Nagar SRA CHS (prop). | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | C.T.S. No. | Area as per Property card (Sq.mtr. | Area declared as "Slum Rehabilitation Area" (Sq. mtr.) | Consolidated Boundaries | | | |
| | | | | East | West | South | North |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 9 | (affected Slum area in Road) | - | 129.28 | C.T.S. No. 109/9/, 109/9/A, 109/10 | Road | Road | Road |
| | **Total** | **20239.5** | **6071.48** | | | | |

**Slum Rehabilitation Authority, Brihanmumbai**
Administrative Building,
Prof. Anant Kanekar Marg,
Bandra (E.), Mumbai 400 051.
Date 19th January 2026.

DR. MAHENDRA KALYANKAR,
Chief Executive Officer,
Slum Rehabilitation Authority,
Brihanmumbai.

## चौकशीची जाहीर नोटीस

मा. कोर्ट विदयमान सहायक धर्मादाय आयुक्त-२ नागपूर यांचे न्यायालय

जा.क्र./न्याय शाखा/१०६९९/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सिविल लाईन्स, नागपूर - ०१
दिनांक २५/११/२०२५

अर्ज क्रमांकः - ४९/२०२१
कलम ५०अ (२) (ए)

**सर गंगाधरराव चिटणवीस मेमोरियल रिसर्च ट्रस्ट, नागपूर, ता. जि. नागपूर नोंदणी, क्रमांक ई-८३१ व नागपूर इमरजन्सी मेडिकल सर्व्हिस सोसायटी, सिव्हील लाईन्स, नागपूर नोंदणी क्रमांक एफ-२११२४ चे बाबत मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५० अ (२) (ए) नुसारचा अर्ज**

या जाहीर नोटीसी द्वारे सर्व जनतेला सुचित करण्यात येते की, सर गंगाधरराव चिटणवीस मेमोरियल रिसर्च ट्रस्ट, नागपूर, ता. जि. नागपूर नोंदणी क्रमांक ई-८३१ व नागपूर इमरजन्सी मेडिकल सर्व्हिस सोसायटी, सिव्हील लाईन्स, नागपूर नोंदणी क्रमांक एफ-२११२४ या न्यासासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५०अ (२) (ए) अन्वये सर गंगाधरराव चिटणवीस मेमोरियल रिसर्च ट्रस्ट, नागपूर, ता. जि. नागपूर नोंदणी क्रमांक ई-८३१ या न्यासामध्ये नागपूर इमरजन्सी मेडिकल सर्व्हिस सोसायटी, सिव्हील लाईन्स, नागपूर नोंदणी क्रमांक एफ-२११२४ हे न्यास विलीन करण्याकरिता मंजुरी साठी अर्जदार श्री. मिलीद चिटणवीस व १ यांनी अर्ज दाखल केला आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त नागपूर यांचे शिक्यानिशी आज दिनांक २४.११.२०२५ रोजी दिली.

**अधीक्षक (न्याय शाखा)**,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.